फोन नं.०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.

## तंत्रशिक्षण संचालनालयाचे अधिपत्याखालील विविध कार्यालयांमध्ये "गट क" मधील रिक्त पदांसाठी जाहिरात

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत संचालनालय तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय संस्थांमध्ये गट क संवर्गातील खालील नमूद पदनामांची रिक्त पदे सरळ सेवेने भरतीसाठी अर्हताप्राप्त उमेदवारांकडून एकत्रीतरित्या Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. लघुललेखक (निम्न श्रेणी) वेतनस्तर एस- १४ ( ३८६००-१२२८०० )
२. टिप्पणी सहाय्यक/ लेखापाल/वरिष्ठ लिपीक वेतनस्तर : एस- ८ ( २५५००-८११०० )
३. निदेशक (प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)) वेतनस्तर : एस- ८ ( २५५००-८११००

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक :

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि. ३१/०८/२०२३ सकाळी ११ पासून |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक | दि. २१/०९/२०२३ रात्रौ ११.५९ पर्यंत |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने सामायिक परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी | दि. २२/०९/२०२३ रात्रौ ११.५९ पर्यंत |

उमेदवारांनी **https://ibpsonline.ibps.in/dtedjun23/** या Link वर Online पध्दतीने अर्ज सादर करावयाचे आहेत.

वर नमूद केलेल्या पदांच्या जाहिरातीचा पुर्ण तपशिल या कार्यालयाच्या *www.jdteromumbai.org.in* या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

महाराष्ट्र शासन

फोन नं.०२२ ६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्रमांक : २/विकामुं/तंशि/पदभरती/आस्था-(२)/२०२३/ जाहिरात क्रमांकः 3061 29 AUG 2023

## तंत्रशिक्षण संचालनालयाचे अधिपत्याखालील विविध कार्यालयांमध्ये “गट क” मधील रिक्त पदांसाठी जाहिरात

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या कार्यालयीन आदेश क्र.१२/आस्था(२)/पदभरती/२०२३/३६६, दि.१०/०५/२०२३ नुसार तंत्रशिक्षण संचालनालय व त्याअंतर्गत असलेल्या विविध कार्यालयांमध्ये एकत्रीतपणे पदभरती प्रक्रीया राबविण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर कार्यालयीन आदेशात नमूद केल्यानुसार सदर पदभरती प्रक्रिया तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येणार असून, समिती अध्यक्षांना दिलेल्या प्राधिकारानुसार तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत खुद्द संचालनालय तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणाखालील विविध शासकीय संस्थांमध्ये गट क संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवेने भरतीसाठी अर्हताप्राप्त उमेदवारांकडून एकत्रीतरित्या Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

(१) ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक :

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि. ३१/०८/२०२३ सकाळी ११ पासून |
| ०२ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक | दि. २१/०९/२०२३ रात्रौ ११.५९ पर्यंत |
| ०३ | ऑनलाईन पध्दतीने सामायिक परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी | दि. २२/०९/२०२३ रात्रौ ११.५९ पर्यंत |

(२) उमेदवारांनी https://ibpsonline.ibps.in/dtedjun23/ या **Link** वर **Online** पध्दतीने अर्ज सादर करावयाचे आहेत.

(३) अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व यापुढील परीक्षा / निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

(४) विविध कार्यालयांमध्ये संवर्गनिहाय भरावयाच्या पदांचे सामाजिक /समांतर आरक्षण परिशिष्ट - १ मध्ये दिलेले आहे.

(३) सरळसेवेने भरावयाची पदे व इतर तदनुषंगिक माहिती :

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनस्तर | पदांची संख्या | पदासांठी आवश्यक शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता / अनुभव व अन्य अटी |
|---|---|---|---|
| ०१ | लघुलेखक (निम्नश्रेणी) वेतनस्तर (एस- १४ : ३८६००-१२२८००) | ०६ | (१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(२) मराठी लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनीट आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनीट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |
| ०२ | वरिष्ठ लिपीक वेतनस्तर (एस- ८ : २५५००-८११००) | २९ | (१) कला किंवा वाणिज्य किंवा विज्ञान किंवा कायदा या कोणत्याही मान्यताप्राप्त सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणुन घोषीत केलेली अन्य कोणतीही अर्हता.<br>२. संगणक टंकलेखन प्रमाणपत्र किंवा मराठी टंकलेखनात किमान ३० शब्द प्रती मिनीट वेगमर्यादेचे आणि इंग्रजी टंकलेखनात किमान ४० शब्द प्रती मिनीट वेगमर्यादेचे शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३. किमान शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर कोणत्याही उद्योगात किंवा औद्योगिक उपक्रम किंवा व्यावसायिक संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा महामंडळे किंवा शासनाने स्थापन केलेल्या मंडळामध्ये प्रशासन किंवा लेखा विषयक कामाचा किमान ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव. |
| ०३ | निदेशक (प्रयोगशाळा सहाय्यक) (तांत्रिक) ) वेतनस्तर (एस- ८ : २५५००-८११००) | ०७ | (१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेली महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची यंत्र अभियांत्रिकी किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत व दुरसंचरण अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत व संचरण अभियांत्रिकी किंवा संगणक अभियांत्रिकी किंवा संगणक तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी किंवा रसायन अभियांत्रिकी किंवा रसायन तंत्रज्ञान किंवा उपकरणीकरण अभियांत्रिकी किंवा औद्योगिक अणुविद्युत अभियांत्रिकी किंवा स्वयंमचल अभियांत्रिकी यापैकी कोणत्याही विद्याशाखेतील पदविका परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>(२) शासकीय किंवा निमशासकीय किंवा खाजगी, संस्था किंवा आस्थापना किंवा शासन अंगीकृत, महामंडळामधील प्रयोगशाळा सहाय्यक किंवा साईट सुपरवायजर पदावर किंवा त्याने धारण केलेल्या पदविकेच्या विद्याशाखेशी संबंधीत मॅन्युफॅक्चरिंग किंवा सर्व्हिसींग किंवा मेंटेनन्स किंवा सीएनसी मशीन हाताळण्याचा रोजंदारी किंवा कार्यव्ययी किंवा करार पध्दतीवर किंवा मानधन इत्यादी स्वरुपात पूर्णवेळ कामाचा १ वर्षाचा अनुभव. |

**प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**(४) भरती प्रक्रीयेकरिता विहीत केलेल्या अटी व शर्ती :**

सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत उमेदवाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच पदांची संख्या, परीक्षा स्थगित व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, स्वतःकडे राखून ठेवीत आहेत. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील.

**(५) वयोमर्यादाः**

(५.१) **किमान वयोमर्यादा** –अ) निम्नश्रेणी लघुलेखक या पदासाठी दि. ०१/०८/२०२३ रोजी वय १८ वर्ष पूर्ण.
ब) वरिष्ठ लिपिक या पदासाठी दि. ०१/०८/२०२३ रोजी १९ वर्ष पूर्ण.
क) निदेशक ( प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)) या पदासाठी दि. ०१/०८/२०२३ रोजी १९ वर्ष पूर्ण.

(५.२ ) **कमाल वयोमर्यादा गणण्याचा दिनांक** ०१/०८/२०२३

(५.३) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे.

(५.४) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे

(५.५) खेळाडूंना कमाल वयोमर्यादा ०५ वर्ष शिथिलक्षम, तथापि कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

(५.६) माजी सैनिकांसाठी नेमणूकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. (कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.)

(५.७) दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

(५.८) दिव्यांग / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / स्वातंत्र्य सैनिक पाल्य यांचेकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

(५.९) अनाथ उमेदवारांना अनुसूचित जाती या प्रवर्गातील उमेदवारांसाठी असलेली ४३ वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील.

(५.१०) अंशकालीन उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील. (शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविका धारक)

(५.११) अगोदरच शासन सेवेत असलेल्या नियमित शासकीय कर्मचा-यांकरिता वयोमर्यादा ५० वर्षे इतकी राहील.

तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय सनिव २०२३/प्र.क्र./१४/कार्या १२, दिनांक ०३ मार्च २०२३ अन्वये दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पूर्वी प्रसिध्द होणाऱ्या भरती जाहिराती करिता कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे शिथिलता दिलेली असल्याने वर नमूद सर्व प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे इतकी शिथिलता असेल.

(६) उमेदवाराने अनुभवासंदर्भातील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. रोजंदारी कार्यव्ययी, करार पध्दतीवर, मानधन इ. स्वरूपात केवळ पूर्ण काम केले असल्यासच असा कालावधी अनुभव म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तासीका, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतन, अभ्यांगत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी तसेच अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/४/१२, दि.३.७.२००४)

(७) सेवा प्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. मात्र मराठी व हिंदी विषयांसह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार प्रचलित तरतूदींनुसार उपरोक्त परीक्षेतून उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यास पात्र राहील.

(८) अधिवास प्रमाणपत्र :

उमेदवार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. उमेदवाराकडे सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(९) आरक्षण :

(९.१) मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादीत राहील. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करणे आवश्यक राहील.

(९.२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दिपत्रक क्रमांक संकीर्ण १११८/प्र.क्र.३९/, द. १९/१२/२०१८ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही, तर सामाजिक आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

(९.३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण हे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/ प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/०२/२०१९ मधील तरतूदींनुसार राहील. ज्या उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखाच्या आत असेल त्या उमेदवारास आर्थिकदृष्ट्या दुर्बल समजण्यात येईल व या आरक्षणाच्या लाभासाठी पात्र राहील. हा लाभ घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचे पात्रता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(९.४) दिव्यांगांसाठीचे आरक्षण हे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९/०५/२०१९ मधील तरतूदींनुसार राहील. दिव्यांगांच्या १) अंध / अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता ३) अस्थिव्यंगता / मेंदूचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारिरीक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims) / स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disablity) / मानसिक आजार (Mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध प्रकारांसाठी आरक्षण विहीत केलेले आहे. दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणा-या व्यक्तीने सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(९.५) दिव्यांगांकरीता आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवाराचा समावेश, उमेदवार ज्या सामाईक प्रवर्गाचा असेल त्या प्रवर्गात करण्यात येईल. दिव्यांग आरक्षणासाठी किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील.

(९.६) माजी सैनिक यांना शासन सेवेतील गट क च्या पदावर भरतीसाठीचे आरक्षण हे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१२/प्र.क्र.१९८/१६-अ, दिनांक ३०/०४/२०१३ मधील तरतूदींनुसार राहील. तसेच त्यांनी माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी संबंधित सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(९.७) शालेय शिक्षण, क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१/०७/२०१६ सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमूद, तसेच दिनांक १०/१०/२०१७ व दिनांक १५/११/२०१७ च्या शासन शुध्दिपत्रकान्वये सुधारित केलेल्या स्पर्धा / खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले व शासन निर्णयातील क्रीडा विषयक अर्हता, सर्वसाधारण अर्हता, अटी व शर्तींची पूर्तता करणारे खेळाडू सदर आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र ठरतील. तथापि खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक राहील, अन्यथा उमेदवारास खेळाडू करिता राखीव पदावर नियुक्ती अनुज्ञेय राहणार नाही.

(९.८) भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी संबंधित सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती उमेदवार वगळून इतर उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत **(Non Cremy Layer Certificate)** दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(१०.१) खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. ( महिला व बाल विकास विभाग दि. ०४/०५/२०२३ रोजीचा शासन निर्णय.)**

(११) परीक्षेचे स्वरुप :

(११.१) जाहिरातीमधील नमूद पदांकरिता Computer Based Test स्वरुपाची सामायिक परीक्षा घेण्यात येईल. उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे मूळ प्रमाणपत्र / दस्तऐवज यांची पडताळणी करण्याच्या अटीस अधीन राहून उमेदवारास सामायिक परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल. परिक्षेस उपस्थित राहण्यास परवानगी दिली याचा अर्थ उमेदवार सदर पदाकरिता पात्र आहे असा होत नाही.

(११.२) लघुलेखक (निम्न श्रेणी) व वरिष्ठ लिपिक या पदांकरीता उमेदवारांची निवड करताना, मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा घेण्यात येईल. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण मिळविणा-या उमेदवारांमधून निवड सूची तयार करुन, निवड सूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल.

(११.३) प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) या पदाकरीता व्यावसायिक चाचणी (Proficifiency Test) घेणे आवश्यक असेल. सदर पदाकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ३० गुण ठेवून एकूण १२० गुणांची वस्तुनिष्ठ बहूपर्यायी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि जे उमेदवार परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील, असे उमेदवारच व्यावसायिक चाचणीस पात्र ठरतील. परीक्षा व व्यावसायिक चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल.

(११.४) शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दिनांक ०५/०६/२०१४ नुसार मुलाखत (मौखिक परीक्षा) घेण्यात येणार नाही.

(११.५) उमेदवारांना ऑन लाईन परीक्षेसाठी व व्यावसायिक चाचणी साठी (Proficifiency Test) नेमून दिलेल्या / घोषित केलेल्या केंद्रावर स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

(११.६) उमेदवारांना परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७/०६/२००८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

( १२) परीक्षा शुल्क :

(१२.१) अराखीव (अमागास) प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांना सामायिक शुल्क रुपये १०००/- (अक्षरी एक हजार रुपये फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांकरिता रुपये ९००/- (अक्षरी रुपये नऊशे फक्त) राहील. माजी सैनिकांकरिता सामायिक परीक्षा शुल्क लागू राहणार नाही. सदरचे परीक्षा शुल्क ऑन लाईन पध्दतीने भरणे क्रमप्राप्त राहील.

(१२.२) उमेदवारांनी एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केल्यास त्यास प्रत्येक अर्जाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क जमा करावे लागेल.

(१२.३) परीक्षा शुल्क ना परतावा ( Non refundable ) आहे

(१३) **<u>ऑन लाईन अर्ज प्रक्रीया :</u>**

(१३.१) उमेदवारास दिनांक ३१/०८/२०२३ ते दिनांक २१/०९/२०२३ या कालावधीत ***www.jdteromumbai.org.in*** या वेबपोर्टलवर पदभरती संदर्भातील ऑनलाईन अर्ज उपलब्ध राहील. कोणत्याही परिस्थितीत हस्तदेय/टपाल/कुरिअर इत्यांदीद्वारे ऑफलाईन पध्दतीने तसेच ई-मेल अथवा अन्य ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

(१३.२) ऑन लाईन नोंदणी झाल्यानंतर उमेदवारास वैयक्तिक माहिती, अतिरीक्त माहिती तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव याचा तपशील भरण्याकरिता उपलब्ध होईल. सदर पद भरतीच्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाहीकरिता उमेदवारास नोंदणी झाल्यानंतर प्राप्त होणारा युजर आय डी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक राहील.

(१३.३) उमेदवाराने ऑनलाईन अर्जाकरिता स्वत:चा अलीकडच्या काळातील फोटो (Colour Photo with White background, File size 20-50 KB, 200 dpi, JPG / JPEG format, photo size 3.5 cm X 4.5 cm), स्वत:ची स्वाक्षरी काळया शाईच्या पेनाने (File size 10-20 KB, JPG / JPEG format) व काळया/निळया रंगाच्या शाईने डाव्या अंगठयाचा ठसा (File size 20-50 KB, JPG / JPEG format) इत्यादी ऑनलाईन फार्म भरतांना अपलोड करणे आवश्यक आहे.

(१३.४) शैक्षणिक अर्हता, अनुभवाची प्रमाणपत्रे, संगणक हाताळणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवासाचा दाखला, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अनाथ, दिव्यांग, खेळाडू, माजी सैनिक या संदर्भातील दाखले, प्रमाणपत्रे, इत्यादीबाबींची पुर्तता करीत आहे असे गृहीत धरुन उमेदवाराला परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. भविष्यात सदर कागदपत्रांची पुर्तता करण्यास उमेदवार असमर्थ राहील्यास सदर उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल.

(१३.५) उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑन लाईन पध्दतीने विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे. परीक्षा शुल्क अदा केल्यानंतर Payment Transaction Successful झाले असल्याबाबतची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. Payment Transaction Succesful झाल्यानंतरच अर्ज अंतिम समजण्यात येईल.

(१३.६) सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण / आदिवासी विकास / जिल्हा सैनिक बोर्ड / अपंग कल्याण कार्यालय इत्यादी मध्ये नांव नोंदणी केलेल्या, तसेच प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / अंशकालीन पदवी / पदविका धारक उमेदवारांनी देखील ऑन लाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

१४) उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरण्यापूर्वी जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पूर्ण करत आहोत का याची खात्री करुन घ्यावी. उमेदवाराने ऑन लाईन अर्जात नमूद केलेल्या मूळ प्रमाणपत्रे पडताळणीच्या अधीन राहून पदभरती प्रक्रीयेत सहभागी होण्यास परवानगी देण्यात येईल. पदभरती प्रक्रीयेत सहभागी होण्यास परवानगी दिली म्हणजे उमेदवार पात्र आहे असे नाही. पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने भरलेली / सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळून आल्यास किंवा पदभरती प्रक्रीयेत कोणतेही गैरवर्तन केल्यास, कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास तात्काळ पदभरती प्रक्रीयेतून अपात्र ठरविण्यात येईल.

१५) **तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुंबई / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर / नाशिक या विभागातील रिक्त पदांची पदभरती एकत्रित होत असल्याने उमेदवारानी ऑनलाईन अर्ज भरताना दिलेल्या विभागाच्या पसंतीक्रमानुसार आणि त्यांच्या गुणवत्ता क्रमानुसार त्या त्या विभागात निवड करण्यात येईल. अर्जदाराने सर्व विभागांना पसंती क्रमांक देणे अनिवार्य राहिल. गुणवत्ता क्रमानुसार व त्याच्या पसंतीक्रमानुसार निवड झालेल्या उमेदवारास संबंधीत विभागीय कार्यालयाकडून त्यांच्या अधिपत्याखालील असलेल्या कोणत्याही शासकीय संस्थेत जागांच्या उपलब्धतेनुसार नियुक्ती देण्यात येईल.**

१६) परीक्षेकरीता येताना ओळख पटविण्यासाठी उमेदवारांनी स्वत:चे पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालवण्यांचा परवाना / पासपोर्ट / मतदान कार्ड यापैकी कोणतेही एकाची मुळप्रत व १ छायांकित प्रत इत्यादी सोबत आणावी.

१७) सामायिक परिक्षा तसेच व्यावसायीक चाचणी परिक्षेकरिता उपस्थित राहण्याकरिता उमेदवारांकडे अधिकृत प्रवेशपत्र **(Admit card)** असणे आवश्यक आहे. परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशपत्रे या कार्यालयाचे संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ ते १० दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्राची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारांस परिक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही. तसेच प्रवेशपत्राबाबत **(Admit card)** उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१८) अर्ज भरताना उमेदवाराने आपली संपूर्ण शैक्षणिक माहिती क्रमाक्रमाने भरावी. जसे की, (१० वी /१२ वी/पदविका (Diploma)/ पदवी (Degree) /पदव्युत्तर) इत्यादी.

१९) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

२०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतूदींन्वये हयात असलेल्या अपत्यांची संख्या ०२ पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८-०३-२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

२१) निवड समितीने तयार केलेली निवड सूची १ वर्षासाठी किंवा निवड सूची तयार करताना ज्या दिनांकाची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या दिनांकापर्यंत, या पैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवड सूची व्यपगत होईल.

२२) उमेदवारांनी ऑन लाईन अर्जामध्ये माहिती भरताना कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.

२३) अतिरीक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन, बिंदू नामावली इत्यादी व अन्य कारणांमुळे पदसंख्या (पदसंख्येत कमी / जास्त होणे) व आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

२४) पद भरती प्रक्रीयेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील. तसेच न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्यांचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.

२५) शासन निर्णय क्रमांक अनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ मधील तरतुदीनुसार शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती झाल्यामुळे त्यांना पूर्वीची " नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना " व सध्याची " राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) " लागू राहील. मात्र निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निधी योजना लागू होणार नाही.

**"महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दिनांक ३१/०३/२०२३ मधील तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंबनिवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्त उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करण्यात येईल."**

२६) गुणवत्तेनुसार निवड यादीत समाविष्ट असलेल्या उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करता बोलाविण्यात येईल, पडताळणीच्यावेळी उमेदवाराने संबंधित मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे व त्याच्या ०२ स्वसाक्षांकित प्रतींसह उपस्थित राहणे आवश्यक राहील.

२७) शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती प्रमाणपत्रे संबंधित प्राधिकरणास पडताळणीकरिता पाठविण्यात येतील. मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीचेवेळी उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता, अनुभव अथवा दोन्ही धारण करीत नसल्यास किंवा उमेदवाराचे प्रमाणपत्र / कागदपत्र खोटे अथवा बनावट आढळून आल्यास अथवा उमेदवाराने मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२८) संपूर्ण पदभरती प्रक्रीयेस उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर संपूर्ण पद भरती ही शासनाने पद भरती संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश, निर्णय इत्यादी मधील तरतूदींनुसार करण्यात येईल.

२९) उमेदवारास अर्ज भरताना काही अडचणी आल्यास https://cgrs.ibps.in/ या वेब पृष्ठावर संपर्क साधावा.

**या जाहिरातीसंबंधी होणाऱ्या सर्व सूचना www.jdteromumbai.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. कोणत्याही उमेदवारांना वैयक्तीकरित्या कळविण्यात येणार नाहीत. त्यासाठी सर्व उमेदवारांनी ऑन लाईन अर्ज भरल्यापासून प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत या कार्यालयाचे संकेतस्थळ *<u>www.jdteromumbai.org.in</u>* सातत्याने पहावे.**

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

परिशिष्ट – १

संवर्गनिहाय व आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

## पदाचे नाव : लघुलेखक निम्नश्रेणी

वेतनश्रेणी :- एस-१४ (३८६००-१२२८००)

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

एकूण पदे : ०३

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| महिला | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ |

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

एकूण पदे : ०१

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
एकूण पदे : ०१
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
एकूण पदे : ०१
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |

## पदाचे नाव : टिप्पणी सहाय्यक/लेखापाल/वरिष्ठ लिपीक

वेतनश्रेणी :- एस-८ (२५५००-८११००)

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

एकूण पदे : ०२

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ |

कार्यालयाचे नाव : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

एकूण पदे : ०२

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
एकूण पदे : ०४ (ग्रामीण)
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ४ |
| सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ४ |

कार्यालयाचे नाव : तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
एकूण पदे : ०१ (शहरी)
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

कार्यालयाचे नाव: तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
एकूण पदे : ०६
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | २ | ० | २ | ६ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | १ | ३ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | २ | ० | २ | ६ |

कार्यालयाचे नाव: तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
एकूण पदे : ०३
भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| महिला | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ |

कार्यालयाचे नाव: तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.

एकूण पदे : ०७

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | १ | ७ |
| सर्वसाधारण | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | १ | ७ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | १ (कर्णबधीर करीता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता करीता आरक्षित) | | | | | | | | | | |
| एकूण | १ | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | १ | ७ |

कार्यालयाचे नाव: सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

एकूण पदे : ०४

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ४ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | २ |
| महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ४ |

## पदाचे नाव : निदेशक (प्रयोगशाळा सहाय्यक) (तांत्रिक) )

वेतनश्रेणी :- एस-८ (२५५००-८११००)

कार्यालयाचे नाव: तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

एकूण पदे : ०२

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |
| सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ |

विभागाचे नाव : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.

एकूण पदे : ०५

भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील :

| प्रवर्ग | अ.जा. १३ % | अ.ज. ७ % | वि.जा. (अ) ३ % | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५ % | भ.ज. (ड) २ % | वि.मा.प्र. २ % | आ.दु.घ. १० % | इ.मा.व. १९ % | अराखीव ३८ % | एकूण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ५ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | | | | | | | | | | |
| दिव्यांग | ० | | | | | | | | | | |
| एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ | ५ |

## परिशिष्ट — २

### प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार भरता येतील अशा पदांचा पदनामनिहाय तपशील.

| अ..क्र. | पदनाम | मुख्य कार्यालय, मुंबई | म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ० | ० | ३ | ० | ० | १ | १ | १ | ६ |
| २ | टिप्पणी सहाय्यक/लेखापाल/वरिष्ठ लिपीक | २ | २ | ५ | ६ | ४ | ३ | ० | ७ | २९ |
| ३ | निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ५ | ७ |
| | एकूण | २ | २ | १० | ६ | ४ | ४ | १ | १३ | ४२ |